**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास व पंचायतराज विभाग**
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.
EmailID: supriya.ghotale@mah.gov.in

---

**तात्काळ /स्मरणपत्र**

**क्रमांक : संकीर्ण-३१२५/प्र.क्र.३५७/आस्था-८** **दिनांक : १९.११.२०२५**

**प्रति,**

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय :** संशयास्पद दिव्यांग प्रमाणपत्राचे आधारे शासकीय नोकरी मिळविणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रमाणपत्राची चौकशी करणेबाबत..

**संदर्भ :** या कार्यासनाचे समक्रमांकाचे दि.०६.११.२०२५ रोजीचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये मागविण्यात आलेली माहिती अद्यापही अप्राप्त आहे. आता उपरोक्त विषयाबाबत उप सचिव, दिव्यांग कल्याण विभाग यांच्या दि.१५.११.२०२५ रोजीच्या स्मरणपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

२. संदर्भीय पत्रासोबत जोडण्यात आलेल्या यादीमधील नमूद आपल्या कार्यालयाशी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचे दिव्यांग प्रमाणपत्राची/ वैश्विक दिव्यांग ओळखपत्र (UDID) पडताळणी करुन संबंधिताचे प्रमाणपत्र अवैध अथवा खोटे आढळल्यास किंवा दिव्यांगत्वाचे प्रमाण लाक्षणिक दिव्यांगत्व ४० टक्के पेक्षा कमी आढळल्यास दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम-९१ नुसार कारवाई करुन अहवाल दि.३०.११.२०२५ पर्यंत परस्पर दिव्यांग कल्याण विभागास पाठवावा व त्याची प्रत या विभागास सादर करण्यात यावी, ही विनंती.

आपली,

(सुप्रिया कि. घोटाळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र- वरीलप्रमाणे

"जनहिताय सर्वदा"

**महाराष्ट्र शासन**


दिव्यांग कल्याण विभाग,
३१, ३२, ३५ ए, मित्तल टॉवर, ए-विंग, तिसरा मजला,
बॅरीस्टर रजनी पटेल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-०२१.
दूरध्वनी क्र.- ०२२-४०१४५१७६ Email ID : sunanda.ghadyale@nic.in


---

**क्रमांक** : संकिर्ण-२०२५/ प्र.क्र.०८/कार्यासन -३ **दिनांक** : नोव्हेंबर, २०२५

**ई-ऑफीस क्र. १३६४८२२**

**स्मरणपत्र-१**

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव,
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

२) प्रधान सचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

३) प्रधान सचिव,
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

४) प्रधान सचिव,
सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.

५) सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

**विषय:-संशयास्पद दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय नोकरी मिळणविणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांच्या दिव्यांग प्रमाणपत्राची चौकशी करणेबाबत.**

**संदर्भ:-** १) श्री. दिगंबर भगवान घाडगे (पाटील), महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना, मुंबई यांचे दिनांक ०९ सप्टेंबर, २०२५ रोजीचे पत्र.
२) या कार्यासनाचे समक्रमांक दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयावरील संदर्भाधिन पत्राची सोबतची प्रत कृपया पहावी.

२. राज्यातील विविध विभागातील सुमारे २४१ संशयास्पद दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकरीचा लाभ घेतलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची चौकशी करुन शासनाची दिशाभूल करुन लाभ देणाऱ्या व लाभ घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची विनंती श्री. घाडगे (पाटील) यांनी केली आहे. त्यास अनुसरुन संबंधित २४१ अधिकाऱ्यांच्या दिव्यांगत्वाची तसेच त्यांच्या दिव्यांगत्व प्रमाणपत्राची / वैश्विक दिव्यांग ओळखपत्र (UDID) ची पडताळणी करुन कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत या विभागास

३० दिवसांत अवगत करण्याबाबत उपरोक्त संदर्भाधिन क्र. २ अन्वये कळविण्यात आलेले आहे. तथापि त्याबाबतचा अहवाल या विभागास अद्यापी अप्राप्त आहे. तरी, उपरोक्त बाबत कार्यवाही करुन त्याबाबत दिनांक ३० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत या विभागास अवगत करण्यात यावे, ही विनंती.

Digitally signed by VINAYAK VITTHAL BASWANT
Date: 15-11-2025 17:28:13

**(बि.वि.बसवंत)**

**सोबत: वरिल प्रमाणे.**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**